# कोरोना विषाणू प्रादुर्भाव कमी करण्यासाठी राबविलेले उपक्रम

## वर्तमान पत्रातील बातम्या

### कोरोना माहिती पत्रकाचे ओंकारमध्ये प्रकाशन

गडहिंग्लज, ता. १३ : येथील ओंकार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व राजर्षी शाहू कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे कोरोना विषाणूच्या संसर्गाची मुख्य लक्षणे व उपाय या विषयावर जनजागृती माहितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. कोरोनामुळे आतापर्यंत जगभरात हजारो लोकांचा मृत्यू झाला आहे. यापुढेही या आजाराची लागण होण्याची शक्यता आहे. हा विषाणू देशात कमी प्रमाणात असला तरी लोकांनी काळजी घेण्याची गरज आहे. काही उपायाद्वारे ही साथ थोपवू शकतो. याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाचे हा उपक्रम राबवला. प्र. प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण यांनी कोरोना विषाणूची लक्षणे व काळजी याबाबत मार्गदर्शन केले. माजी नगराध्यक्ष राजन पेडणेकर, कार्यक्रम अधिकारी डॉ. काशिनाथ तनंगे यांनी संयोजन केले. सुरेश धुरे, प्रकाश कांबळे यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते.



गडहिंग्लज : ओंकार कॉलेजमध्ये कोरोना माहितीपत्रकाच्या प्रकाशनप्रसंगी राजन पेडणेकर, डॉ. सुरेश चव्हाण, काशिनाथ तनंगे, सुरेश धुरे, प्रकाश कांबळे आदी.

### 'ओंकार'कडून कोरोनाबाबत जनजागृती

गडहिंग्लज : येथील ओंकार महाविद्यालयातर्फे कोरोनाबाबत जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. माहिती पत्रकाचे प्रकाशन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा व्हॉटस्‌ॲप ग्रुप तयार केला आहे. त्यांच्या माध्यमातून कोरोनाबाबतची माहिती गावागावांत पोहोचविली जात आहे. कोरोनाबाबत गैरसमज, भीती, शंकांचे निरसन करण्यासाठी महाविद्यालयात समुपदेशन कक्षाची स्थापना केली आहे. आजी-माजी विद्यार्थ्यांकडून मास्कचे वाटप केले आहे. संस्थेचे अध्यक्ष राजन पेडणेकर, प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. काशिनाथ तनंगे, माजी विद्यार्थी संघटना, राष्ट्रीय सेवा योजनेचे १०० स्वयंसेवक कार्यरत आहेत.

दै. सकाळ शुक्रवार 24

### माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने

तरूण भारत दि. 20 एप्रिल 2020

माजी विद्यार्थी संघटना आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मास्कचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी घरी हे मास्क बनवून ज्या त्या गावात वाटप करण्यात आले. येथील मेटाचा मार्ग, बेघर वसाहत, पाटील कॉलनी, आजरा रोड या भागातील गरजू लोकांना मास्कचे वाटप करण्यात आले. त्याबरोबर कोरोनाच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी खबरदारीचे पत्रकही वाटप केले. यावेळी सुभाष कांबळे, शिवराज साबती, योगेश पुकळे, प्रा. डी. जी. चिघळीकर, एनएसएसचे डॉ. काशिनाथ तनंगे, अनिल सावरे, प्रियांका नाईक, वालूश्री कुंभार, ऋतुजा पाटील, यांच्यासह अन्य उपस्थित होते.